# कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in





जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९६५ /२०२६ दि.०९/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी, कापूरबावडी** वाहतूक उपविभागाचे हदद्ीत दिनांक ०५/०९/२०२६ रोजी **'साई जलाराम प्रतिष्ठान'** तर्फे **'गोपाळकाला'** निमित्ताने बाळकुम नाका येथे दहिहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्त नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणुन, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए./११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) साकेत कडून बाळकुम मार्गे कशेळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साकेत कॉम्प्लेक्स जवळील महालक्ष्मी मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने साकेत कॉम्प्लेक्स जवळील महालक्ष्मी मंदिर येथून डावे वळण घेवून रुस्तमजी कट येथुन नाशिक – मुंबई महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कशेळी कडून बाळकुम मार्गे साकेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने सरळ पुढे जावून कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) माजिवडा गावातून लोढा संकुलातून बाहेर पडून बाळकुम कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लोढा संकुल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने लोढा संकुल येथून उजवे वळण घेवून ग्लोबल हॉस्पिटल समोरुन – साकेत कॉम्प्लेक्स, महालक्ष्मी मंदिर येथून उजवीकडे वळण घेवून रुस्तमजी कट येथून नाशिक – मुंबई महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) मुंबई – नाशिक महामार्गावरून साकेत कट येथून डावीकडे वळण घेवून बाळकुमकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साकेत ब्रिज खाली 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरुन जाणारी वाहने ही उजवीकडे वळण घेवुन साकेत कॉम्प्लेक्स महालक्ष्मी मंदिर येथुन उजवीकडे वळण घेवुन रुस्तमजी कट येथुन नाशिक – मुंबई महामार्गा वरुन इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०५/०९/२०२६ रोजी सकाळी १०:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो लागू राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, रूग्णवाहिका, फायर ब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर** :–

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/वि.शा. ठाणे


**प्रत कार्यवाहीसाठी** :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ ठाणे/वागळे वाहतूक विभाग, पोनि. कासारवडवली, कापूरबावडी, वागळे वाहतूक उपविभाग, ठाणे शहर




Scanned with OKEN Scanner